ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २७ | पुणें, बुधवार तारीख २५ जानेवारी, १९६१ | अंक २



**५०** वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

# ★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

समासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.





आज बाजारांत अनेक ब्राम्ही तेलें उपलब्ध आहेत; परंतु ब्राम्ही तेलाच्या मूळ कल्पनेचें श्रेय सांडू बंधूनांच द्यावें लागेल. सांडू बंधूंच्या आयुर्वेदावरील प्राचीन ग्रंथांच्या गाढ्या व्यासंगाचें तें फळ आहे. ह्या ग्रंथांतून 'ब्राम्ही' या अल्पमोली परंतु बहुगुणी वनस्पतीचा, मेंदूच्या अगर उष्णतेच्या विकारांवर उपयोग सांगितला आहे. त्यावरूनच श्री. दत्तात्रेय कृष्ण सांडू यांना ब्राम्ही वनस्पती-युक्त तेल करण्याची कल्पना सुचली. औषधी म्हणून अथवा एरव्हीं सुगंधी तेल म्हणून लावण्यास उपयोगी पडणारें बहुगुणी तेल तयार करण्यासाठीं त्यांनी प्रयोग सुरू केले व भारतांत प्रथमच "ओरिजिनल ब्राम्ही तेल" तयार करून तें लोकप्रिय केलें.

महत्वाचें पान

१८९९-१९६०

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रा. लि. चेंबूर-मुंबई ७१

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रायव्हेट लि. हीरक महोत्सव



## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार



# सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९१८ ]	गिरगांव, मुंबई ४.	[ टेलि. : ७०१४

### महाराष्ट्राची अग्रेसर सहकारी बँक

| | | | | |
|---|---|---|---|---|
| भाग भांडवल : | ... | ... | रु. | ८,५९,००० |
| रिझर्व्ह फंडस् : | ... | ... | रु. | ९,७३,००० |
| ठेवी : | ... | ... | रु. | १,३१,००,००० |
| खेळतें भांडवल : | ... | ... | रु. | १,६७,००,००० |

शाखा : फोर्ट, दादर, वरळी, वडाळा, माहीम, पुणें, बेळगांव.

स्त्रियांची शाखा : सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.



महाराष्ट्रांतील लहानमोठ्या उद्योगधंद्यांची आर्थिक अडचण तत्परतेनें दूर करून महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासास संपूर्ण साह्य करणारी

(शिड्यूल्ड बँक) # दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें (स्थापना १९३३)

मुख्य ऑफिस :—प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, थोरले बाजीराव रस्ता, पुणें २. (फोन नं. ६५६३)

मुंबई शाखा :—८१ मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १. (फोन नं. २५३४०८)

: संचालक मंडळ :

श्री. छोटालाल धरमसी जोशी (प्रोप्रायटर-कमलाकांत छोटालाल अँड को. (इम्पोर्टर्स, एक्स्पोर्टर्स मुंबई) अध्यक्ष.
श्री. गणेश उद्धव चितळे (सुपरिंटेंडेंट, पैसाफंड काच कारखाना) उपाध्यक्ष.
श्री. गणेश रामचंद्र साठे (डायरेक्टर, साठे बिस्किट अँड चाकोलेट कं. लि. पुणें)
श्री. चिंतामण त्रिंबक चितळे (ऑ. सेक्रेटरी, पैसाफंड ग्लास वर्क्स, तळेगांव)
श्री. वासुदेव पांडुरंग वैद्य (इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल इंजिनियर)
श्री. विनयकुमार नारायण सरदेसाई (मॅ. डायरेक्टर, एशियाटिक इंडस्ट्रिअल एजन्सीज लि. मुंबई)
श्री. सदाशिव कृष्णाजी भागवत (प्रोप्रायटर, राम एजन्सी) पुणें.
श्री. मोहनलाल हंसराज लुनावत (व्यापारी) पुणें.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★

मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाच्या नवीन योजनेबाबत समक्ष भेटा.

—बी. वाय्. पाठक, ॲ. मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. २५ जानेवारी, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कमाल जमीनधारणा बिलाचा अनिष्ट परिणाम

महाराष्ट्र सरकारनें राज्यांतील शेतजमिनीसंबंधीं मंजूर करूं घातलेल्या कमाल जमीनधारणा बिलाविषयीं डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशनतर्फे एक पत्रक काढण्यांत आलें आहे. पत्रकांत असें म्हटलें आहे कीं, आर्थिक जीवनाच्या ज्या एका विभागांत स्थैर्य आणि सुबत्ता नांदत होती, त्या विभागांत ह्या बिलामुळें गोंधळ माजणार आहे. महाराष्ट्रांतील व्यापारी व औद्योगिक संस्थांवर बिलामुळें होणारे वाईट परिणाम टाळण्याच्या दृष्टीनें सरकार बिलांत योग्य त्या सुधारणा करील अशी आशा आहे. असोसिएशनच्या ह्यासंबंधीच्या दृष्टिकोणाचा खुलासा करतांना संघटनेचे अध्यक्ष मि. एफ्. एडवर्डस् म्हणाले कीं, महाराष्ट्रांतील साखरेचा धंदा यशस्वी करण्यांत जुन्या व सुस्थिर जॉइंट स्टॉक कंपन्यांनीं प्रथमपासून मेहनत घेतलेली आहे. उसाची लागवड कारखान्याच्या नियंत्रणाखालीं असेल तरच कमी खर्चांत उत्तम प्रतीची साखर करतां येते ही गोष्ट अनुभवानें सिद्ध झालेली आहे. महाराष्ट्रांत दर एकरीं होणारें उसाचें पीक आणि त्यापासून करण्यांत येणाऱ्या साखरेचें प्रमाण लक्षांत घेतां राज्य सरकारनें ह्या बाबतींत हस्तक्षेप करण्याचें कारण समजत नाहीं. कमी खर्चांत अधिक साखरेचें उत्पादन करून हिंदनें जागतिक साखर बाजारांत भाग घ्यावा व परदेशीय चलन मिळवावें म्हणून मध्यवर्ती सरकार कारखान्यांना उत्तेजन देत आहे. उसाचें दर एकरीं पीक व दर एकरीं होणारें साखरेचें उत्पादन ह्या बाबतींत महाराष्ट्र जाव्हा देशाच्या अगदीं जवळ आहे. अशा परिस्थितींत भूमिहीनांना जवळ करून साखर कारखान्यांना अडचणी उत्पन्न करणाऱ्या बिलाचें प्रयोजन समजणें कठीण आहे. जमिनीची वांटणी करण्यांत आली तर दर एकरीं उसाच्या पिकांत खूपच घट होईल.

### ऊंसउत्पादन आणि साखरेचें प्रमाण

| | दर एकरीं उसाचें उत्पादन (टन) | उसापासून साखरेचें सरासरी प्रमाण (%) |
|---|---|---|
| जावा ... | ५६·२० | ११·४९% |
| महाराष्ट्र ... | ५३·२५ | ११·८०% |
| सबंद भारत ... | १४·७० | ९·८४% |

## आतां साखरेचा खप वाढविण्याची मोहीम !

इंडियन शुगर मिल्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. डी. डी. पुरी ह्यांनीं साखरेच्या धंद्यासाठीं दीर्घकालीन धोरण आंखून त्या धंद्याला स्थैर्य प्राप्त करून देण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. आंध्र प्रदेश फेडरेशन ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ह्या संस्थेनें केलेल्या स्वागताला ते उत्तर देत होते. श्री. पुरी आपल्या भाषणांत म्हणाले कीं, साखरेच्या धंद्यापुढें संकट उभें राहिलें होतें. सुमारें १२ महिन्यांपूर्वी देशांत साखरेची खूपच चणचण होती. पण अंशतः सरकारी धोरणामुळें आणि ऊंस शेतकऱ्यांचे व कारखानदारांचे कष्टामुळें संकटाला तोंड देतां आलें. आज देशांत साखरेची सुबत्ता आहे. पण त्यामुळें धंद्यापुढें नव्या अडचणी उभ्या राहिल्या आहेत. सध्यां सुमारें ५ लाख टन साखर शिल्लक आहे. चालू हंगामांत सुमारें २७ लाख टन साखर तयार होईल असा अंदाज आहे. साखरेची परदेशी होणारी निर्यात लक्षांत घेऊन सुद्धां पुढच्या हंगामापूर्वी सुमारें १० लाख टन साखर शिल्लक राहण्याची शक्यता आहे. साखर निर्यात करूनहि ह्या उद्योगधंद्याला फारशी मदत होईल असें वाटत नाहीं. साखरेची निर्यात सामान्यतः दोन लाख टनांपर्यंत होईल. तरी सुद्धां साखर शिल्लकच राहील. म्हणून देशांतील साखरेचा खप वाढविण्याची जरूरी आहे. गेल्या २० वर्षांत साखरेची दुर्मिळता व सुबत्ता होण्याचे प्रकार दोनदां झालेले आहेत. त्यामुळें साखरेच्या धंद्यावर वाईट परिणाम झाला आहे. साखरेचा खप वाढविण्यासाठी डबाबंद फळें तयार करण्याच्या धंद्याला व बिस्किटाच्या कारखान्यांना सवलतीच्या दरानें साखर पुरविण्याची सोय करावी.

## बिहार राज्यांत निघणारा पोलादाचा कारखाना

बिहारमध्यें बोकॅरो येथें हिंदमधील चौथा पोलादाचा कारखाना काढण्यांत येणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यांत ह्या कारखान्याची प्राथमिक तयारी करण्याचें काम सुरू होईल. तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम पूर्ण होण्याच्या आंत सुरू होणाऱ्या ह्या कारखान्यासाठीं २०० कोटि रुपयांचें भांडवल लागेल. प्रारंभीं कारखान्याची वार्षिक उत्पादनक्षमता १० लाख टनांची असेल. पण कारखान्याचा विस्तार करून ही उत्पादनक्षमता १ कोटि टनापर्यंत वाढवितां येण्यासारखी आहे. बोकॅरो जवळील डोंगराळ भागांत कारखाना वसविण्यांत येणार आहे. ह्या भागांत लोखंडाच्या व कोळशाच्या खाणी विपुल प्रमाणांत आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांतच कारखान्याच्या जागेची पहाणी व निवड करण्यांत आली. सर्व जागांत हीच जागा सर्वस्वीं अनुकूल अशी वाटल्यानें सरकारनें जागेची निवड अखेरची म्हणून केली. आतां सरकार स्वतःच हा कारखाना उभारणार आहे. फक्त अगदीं जरूर तेवढीच मदत परदेशांकडून घेण्यांत येईल. कारखान्याला लागणाऱ्या यंत्रसामग्रीपैकीं कांहीं रांची येथील भारी यंत्रसामग्रीच्या कारखान्याकडून मिळविली जाईल. परदेशांकडून मागवावयाच्या यंत्रसामग्रीबद्दल अद्याप निर्णय घेण्यांत आलेला नाहीं. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कारखान्यासाठीं १५० ते २०० कोटि रुपयांची तरतूद करण्यांत आलेली आहे. यंत्रसामग्री, औद्योगिक शक्ति, वाहतूक, खाणी व इतर बाबी ह्यांवरील खर्चासाठीं ही तरतूद मुख्यतः केलेली आहे.

## एम्प्लॉइज प्रॉव्हिडंट फंड योजना
### ३९ उद्योगधंदे व २७ लक्ष वर्गणीदार सामील

एम्प्लॉइज प्रॉव्हिडंट फंडाच्या वर्गणीदारांची संख्या १९५८-५९ मधील २५·४४ लक्षावरून १९५९-६० मध्यें वाढून २७ लक्ष झाली. १९५२ च्या एम्प्लॉइज प्रॉव्हिडंट फंडस् कायद्यान्वयें ही योजना तयार करण्यांत आली व प्रारंभीं ती सहा उद्योगधंद्यांना लागू करण्यांत आली. मार्च १९६० अखेरीस या योजनेच्या कक्षेंत एकूण ३९ उद्योगधंदे आले. १९५९-६० मध्यें फंडाची एकूण वर्गणी १६·१६ कोटी रुपये जमली. १९५८-५९ मधील हाच आंकडा १४·५९ कोटी रुपये होता.

पुढील कांहीं विशिष्ट वर्गांतील कामगारांनाहि या योजनेचा लाभ मिळवा म्हणून सदर वर्षांत तिची कार्यकक्षा वाढविण्यांत आली. ( १ ) बंदिस्त कारखान्याच्या बाहेर कारखान्यांचेंच काम करणारा नोकरवर्ग आणि ( २ ) आपापल्या मालकांच्या संमतीनें फंडाचे वर्गणीदार होण्यासाठी अर्ज करणारा व दरमहा ५०० रुपयांवर पगार असलेला नोकरवर्ग. त्याचप्रमाणें फंडाच्या सदस्यत्वाच्या पात्रतेसाठी ठरविलेली मुदतीची अटहि सैल करण्यांत आली, त्यामुळें १२ महिन्यांच्या किंवा त्याहून कमी कालावधींत किमान २४० दिवस काम केलेला नोकरहि फंडाचा वर्गणीदार बनूं शकेल. यापूर्वी, अशा कामगारानें एक वर्ष अखंड काम केलेलें असावें, १२ महिन्यांच्या मुदतींत किमान २४० दिवस काम केलेलें असावें, अशी अट होती. आतां या दुरुस्तीमुळें १२ महिने पूर्ण न झालेल्या नोकरालाहि सभासद होता येईल.

पूर्वीप्रमाणेंच सन १९५९-६० मध्येंहि फंडाचे पैसे रिझर्व्ह बँकेमार्फत मध्यवर्ती सरकारच्या रोख्यांतच गुंतविण्यांत आले. मात्र अधिक प्राप्ति होण्याच्या दृष्टीनें गुंतवणुकीचें स्वरूप बदलण्यांत आलें होतें. मार्च १९६० अखेरीपर्यंत ७३·४० कोटी रुपये गुंतविण्यांत आले आणि १९५९-६० मध्यें या गुंतवणुकी-पासून २·०९ कोटी रुपये मिळाले. त्यामागील वर्षी १·५८ कोटी रुपये मिळाले होते.

एम्प्लॉइज प्रॉव्हिडंट फंड कायद्याच्या कक्षेंत स्वखुषीनें आलेल्या कारखान्यांची वा केन्द्रांची संख्या सदर वर्षांत त्यामागील वर्षांतील ५३ वरून वाढून ९५ वर गेली. यावरून ही योजना मालकवर्गांतहि कशी वाढत्या श्रेणीनें प्रिय होऊं लागली आहे हें दिसून येतें.

---

### भारतांतील बटाट्यांचें पीक

भारतांत १९५९-६० मध्यें ८,८५,००० एकर विभागांत बटाट्यांची लागवड झाली असावी व त्यापासून २७,१९,००० उत्पादन यावें असा मध्यवर्ती अन्न व शेतकी खात्याच्या अर्थ व आंकडेवारी विभागाचा अखिल भारतीय अंतिम अंदाज आहे. १९५८-५९ च्या या पिकाच्या किंचित् दुरुस्त अंदाजानुसार लागवडीखालील क्षेत्राचे व उत्पादनाचे हेच आंकडे अनुक्रमें ८,५८,००० एकर व २३,२७,००० टन असे होते. यावरून १९५९-६० मध्यें त्यापूर्वीच्या वर्षापेक्षा लागवडीच्या क्षेत्रांत २७,००० एकरांनीं किंवा ३·१ टक्क्यांनीं व उत्पादनांत ३,९२,००० टनांनीं किंवा १६·८ टक्क्यांनीं वाढ झाल्याचें दिसून येईल. गेल्या वर्षी लागवडीच्या क्षेत्रांतील ही वाढ विशेषतः उत्तर प्रदेश व प. बंगालमध्यें झाली असून अनुकूल हवामान हें त्याला कारण होतें, तर प्रतिकूल हवामानामुळें बिहार राज्यांत घट झाली. पीक काढण्याच्या वेळीं असलेलें अनुकूल हवामान व सुधारलेल्या पद्धतींचा करण्यांत आलेला अवलंब यामुळें प. बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश आणि पंजाब या पिकाच्या उत्पादनांत वाढ झाली.


# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

म्हणौनि मनें कामें वाचा । जो सेवकु होईल इयेचा ।
तो स्वानंद साम्राज्याचा । चक्रवर्ती करी ॥

कंपनी यशस्वी करण्यासाठी कै. आगाशे यांनीं अहर्निश कष्ट घेतले. कंपनीच्या यशःप्राप्तीचा एकच मार्ग म्हणजे साखरेचें उत्पादन वाढविणें हें ओळखून जनतेच्या आर्थिक साहाय्यानें व सहकार्यानें १,००० टनांची मशिनरी घेऊन, साखरेचें उत्पादन कायमचे वाढविण्याची सोय केली. कै. आगाशेसाहेब यांच्या श्रमाचें चीज होऊन कंपनी भरभराटीस आली असून ती भक्कम पायावर उभी आहे. कंपनीची प्रगतिपथावर वाटचाल सदैव चालू राहावी असे प्रयत्न संचालक मंडळहि करीत आहे.

**प्रजासत्ताक दिनाचे मंगल प्रसंगीं जाहीर करण्यास आनंद होतो कीं चालू हंगामाचें आतांपर्यंतचें उत्पादन जवळ जवळ**

## एक लक्ष पोतीं झालें असून

**आणखी उत्पादन जोरांत चालू आहे.**

**प्रजासत्ताक दिनानिमित्त आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना अभिवादन व हार्दिक शुभेच्छा !**

**भारतीय प्रजासत्ताक चिरायु होवो !**

के. व्यं. चांफेकर,
B. E., A. M. I. E.
मॅनेजर.

शं. ल. लिमये,
B. Sc., LL. B.,
अध्यक्ष.

# उपेक्षित किरकोळ दुकानदार सततोद्योगानें बारा चाळींचा मालक झाला !

## व्ही. पी. बेडेकर मुंबई अँड सन्स प्रा. लि. चा सुवर्णमहोत्सव आणि श्री. वासुदेवराव–सौ. रखमाबाई बेडेकर पति-पत्नींची रौप्यतुला.

मसाले, लोणची व पापड ह्यांच्या ह्या सुप्रसिद्ध कारखानदार व व्यापारी फर्मचा सुवर्णमहोत्सव २६ जानेवारी, १९६१ रोजीं मोठ्या प्रमाणावर साजरा होणार आहे. त्यावेळीं फर्मचे प्रमुख श्री. वासुदेवराव बेडेकर ह्यांची षष्ठ्यब्दिपूर्ति आणि बेडेकर पति-पत्नींची रौप्यतुलाहि होणार आहे. ह्या शुभप्रसंगीं सुमारें २५,००० रुपयांची रक्कम गरजू व होतकरू विद्यार्थ्यांच्या साहाय्यार्थ देण्यांत येणार आहे. मुंबईच्या 'श्यामल प्रकाशन' संस्थेतर्फे श्री. वासुदेवराव बेडेकर ह्यांचें विस्तृत आत्मचरित्रहि ह्यावेळीं प्रसिद्ध होणार आहे. हें आत्मचरित्र वाचून उद्योगधंद्यांत पदार्पण करण्यास तरुणांना उत्साह वाटेल, ह्यांत संशय नाहीं. दोन–चार पुस्तकांपेक्षा जास्त शिक्षण झालेलें नसतांहि श्री. वासुदेवरावांनीं आपल्या कल्पकतेनें मसाले व लोणचीं ह्यांच्या कारखानदारींत अखिल भारतीय कीर्ति मिळविली. त्यांनीं यशस्वी रीतीनें धंदा वाढवून लक्ष्मीहि प्रसन्न केली. परंतु, ते आपल्या अभागी देशबांधवांना, कोकणप्रदेशाला आणि भारतमातेला कधींच विसरले नाहींत. त्यांनीं प्रत्येक वेळीं आपल्या शक्तीप्रमाणें आर्थिक साहाय्य करून व्यापारी वृत्ति समाजहिताशीं विसंगत असतां कामा नये, ह्याचें उदाहरण घालून दिलें आहे. श्री. वासुदेवराव ह्यांच्या आत्मचरित्रामुळें त्यांच्या धंदेवाईक दृष्टीची उत्कृष्ट कल्पना येते, त्याप्रमाणेंच त्यांच्या मानवतेचीहि प्रचीति येते. ह्या शुभप्रसंगीं आम्हीं श्री. वासुदेवराव ह्यांना, त्यांच्या कंपनीला व कुटुंबियांना अधिकाधिक सुयश चिंतितों.

### श्री. वासुदेवरावांच्या आत्मचरित्रांतले कांहीं उतारे

" आम्हीं मसाले घरीं कुटण्यास जेव्हां मुंबईला प्रथम सुरुवात केली, तेव्हां फक्त गोडा मसालाच आम्हीं घरीं कुटत होतों. दादा १९२१ सालीं घरदुरुस्ती करण्यासाठी जे गांवीं गेले, तेव्हांपासून ते गांवींच राहूं लागले. मसाले कुटून विकण्याचे त्यांना न आवडल्याचेंहि कारण होतेंच......खप झपाट्यानें व भरपूर होऊं लागला. १९२५ ह्या वर्षी आम्हीं लक्ष्मीपूजन शांत मनानें व संपूर्णपणें निष्कर्जी होऊन केलें.........१९५८ अखेर आमचीं पांच दुकानें सुरू झालीं...... १९२८ सालीं दादरला दोन घरें बांधलीं व १९३९ मध्यें गोवळचें घर नवीन बांधलें...... १ मार्च, १९४३ पासून लिमिटेड कंपनीच्या नांवानें सर्व धंदा व स्थायिक मालमत्ता आहे......सर्व कारखाने ठिकठिकाणीं विखुरले होते ते एकत्र आणण्यासाठी माहीम येथें १५–१६ शे वारांचा प्लॉट खरेदी केला. पण ती 'रेसिडेन्शिअल एरिया' ठरल्यामुळें ४,०५,९०१ रु. खर्चून त्यावर भाड्यानें देण्यासाठी दोन इमारती बांधल्या. कुर्ला, अंधेरी रोडवर 'हेवी इंडस्ट्री एरिआ' मध्यें एक जागा घेण्याचें नक्की केलें असून त्याचें आतां खरेदीखतहि झालें आहे... २ ऑगस्ट, १९५७ रोजीं शांताराम वाडींतील आणखी पांच चाळींचें खरेदीखत पूर्ण होऊन एकूण पाऊण वाडी बेडेकरांच्या मालकीची झाली......१९५६ सालीं गोवळ येथील महेश्वराच्या देवळाचा जीर्णोद्धार कै. विश्वनाथ पर्शराम बेडेकर ह्यांच्या स्मरणार्थ केला.......ज्या मंदिरांत पुराण सांगण्यासाठी म्हणून श्रीमहेश्वरांच्या प्रेरणेनें श्रीमंत सुभेदार रेडीज ह्यांनीं आम्हाला सुमारें दोनशें वर्षांपूर्वी गोवळ गांवीं आणले, त्याच मूळ घराण्यांतील त्यांच्या वंशजांना या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याची बुद्धि श्रीमहेश्वरानें दिली, व शक्तीहि दिली !......माझ्या कारकीर्दींत १९१३ सालीं ज्या दुकानांत मी सदाशिव गल्लींतील दुकानांतून सर्व माल उतरवून घेतला होता, ती चाळ व त्यानंतर ज्या आम्हीं या शांतारामाच्या नव्या चाळींत दुकान आणलें त्या चाळीसह शांताराम वाडींतील एकंदर आठ चाळी आमच्या मालकीच्या झाल्या असून दादर येथील दोन व माहीम येथील दोन मिळून एकंदर बारा चाळींचे मालक होण्याचें भाग्य बेडेकर कुटुंबीयांना श्रीपरमेश्वर कृपेनें लाभलें आहे.......सर्वांत प्रथम तिखट मसाला बनविण्यास १९१७–१८ मध्यें सुरुवात केली. दादांना मसाले घरीं कुटणें तितकेंसें पसंत नव्हतें, म्हणून त्यांच्या अपरोक्ष कुटून ठेवावा लागे......सध्यां घोडपदेव व पांजरापोळा येथें मसाले दळण्याचें काम चालू आहे; त्यांत दोन डिसिन्टीग्रेटर व तीन चक्क्या आहेत.......१९६० सालीं आंब्यांचें २,५०० बंगाली मण व लिंबाचें १,४०० बंगाली मण एवढें यंदाचें लोणचें घातलें घातलें आहे.......जुलै, १९५९ मध्यें दिल्ली येथें भरलेल्या अखिल भारतीय आंबा–प्रदर्शनांत बेडेकर यांच्या लोणच्याला पहिलें बक्षीस मिळालें आहे......पापडांचीहि परदेशांत मागणी वाढत आहे...... आम्हीं सर्व भाऊ वेगळे असूनहि एकत्र आहोंत !...

### व्यापारी दृष्टिकोणांत सुधारणा

" कांहीं नातेवाईक परिचित मंडळी एकप्रकारें कुत्सित भाषेंत बोलत. लग्नसमारंभांत अगदीं नजीकच्या व चांगल्या स्नेह्याकडून-सुद्धां आम्हांला आमंत्रण नसे; त्या लग्नाला आमच्याकडून माल मात्र गेलेला असे ! पण पुढें आमचें आमच्या धंद्यांतलें स्थान जसजसें सुधारू लागलें, तसतसें ह्या स्थितींत फरक पडूं लागला पण त्याला बराच अवधी लोटावा लागला....

" इतर व्यापारी पिढीजात व्यापारी असतात त्यामुळें घरीदारीं व्यापाराच्याच भाषा चालतात. धंद्याच्या सर्व खांचाखोचांचें ज्ञान मुलगा व्यापारांत पदार्पण करतेवेळीं त्यास झालेलें असतें. आमच्या मुलाबाळांना नेहमीं नोकरपेशाच्या लोकांचें संघटण लाभतें त्यामुळें त्या व्यवसायांतील खांचाखोचा जरी सहजपणें कळल्या तरी व्यापारधंद्यांतील खाचांखोचा लहानपणापासून कळत नाहींत. एक–दोन पिढ्या असेंच होणार. माझी अशी समजूत आहे, कीं माझ्यापासून तिसरी पिढी ही व्यापारांबद्दलें बरेंचसें ज्ञान संपादन केलेली निघेल; ही पिढी थोडी ज्ञानी निघेल व आमच्याप्रमाणेंच सत्प्रवृत्तीचीहि असेल, अशी माझी भावना आहे......

" जें कुटुंब संकटांतहि एकसंध राहतें आणि भरभराटीच्या काळांतहि धरणीवर आपले रोविलेले पाय अधांतरीं होऊं देत नाहीं, तेंच वृक्षाप्रमाणें टिकून राहतें. या दृष्टीनें मला माझ्या घराण्याचा, कुटुंबीयांचा, भावांचा आणि माझ्या पुढच्या पिढीचा अभिमान वाटतो. धंद्यांत गर्वाला आणि अभिमानाला मुळींच स्थान नाहीं. नम्रता हें कोणत्याहि धंद्याचें पहिलें भांडवल आहे. ह्या दृष्टीनें आमची सर्व कुटुंबीय मंडळी प्रगतिपथावर आहेत आणि म्हणूनच धंदेवाईक म्हणून मी निरभिमानी असूनहि मी माझ्या कुटुंबासंबंधीं अभिमानी आहे. "

## मध्यवर्ती सरकारच्या नोकरांचा पगार

मध्यवर्ती सरकारच्या १९.०९ लक्ष नोकरांपैकी दरमहा १,००१ रु. किंवा त्यापेक्षा जास्त पगार असणारांची संख्या ३,१९२ एवढी आहे. रेल्वेज, पोस्ट, तार आणि संरक्षण ( मुलकी ) खात्यांतील नोकरांचा त्यांत समावेश होतो. ह्याचा अर्थ, ०.१७% नोकरांचा पगार हजार रुपयांपेक्षा जास्त आहे. १९५३ पासून आतांपर्यंत हें प्रमाण कायम आहे. १९५३ मध्यें ह्या वेतनश्रेणींत फक्त २,०८० नोकर होते; सहा वर्षांत त्यामध्यें १,११२ नें म्हणजे ५३% वाढ झाली आहे. त्यांची खातेवार विभागणी अशी आहे:—

| | एकूण नोकर | १,००१ रु. पेक्षा जास्त पगाराचे नोकर |
|---|---|---|
| रेल्वेज | ११.३४ लक्ष | ५५६ |
| संरक्षण ( मुलकी ) | २.६२ लक्ष | ३०७ |
| वाहतूक दळणवळण | २.४४ लक्ष | ३०७ |
| इतर खातीं | २.६९ लक्ष | २,०२२ |

१९५१ मध्यें, दरमहा ५१ रु. किंवा त्यापेक्षा कमी पगाराचे नोकर ५८.९% होते; १९५९ मध्यें ते ५४.१% झाले. म्हणजे, किमान वेतन वाढत गेलें आहे. ५१ रु. ते १५१ रु. ह्या श्रेणींतील नोकरांचें प्रमाण ( २८% ) कायम राहिलें आहे. १०१ रु. ते २५० रु. श्रेणीच्या नोकरांचें प्रमाण ११% ( १९५१ ) चें १५% ( १९५९ ) झालें आहे. २५१ रु. च्या वरील नोकरांचें प्रमाण १९५१ मध्यें व १९५९ मध्यें अनुक्रमें २.१% आणि २.९% होतें. एकूण नोकरांमध्यें भल्या मोठ्या पगाराचे नोकर कमी आहेत आणि त्यांचेवरच जबाबदारीच्या कामाचा ताण पडतो. कमी पगाराच्या नोकरांची संख्या कमी करून मध्यम श्रेणीच्या नोकरांची संख्या वाढविली तर कामाचा आणि देखरेखीचा दर्जा सुधारेल, अशी अपेक्षा आहे.


नवीन वर्षासाठी योग्य उपक्रम

बँकिंगच्या सर्व सुखसोयींसाठी आपलें खातेंहि सुप्रतिष्ठित बँकेंत हवें.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

आपल्या गरजा पुरविण्यास समर्थ आहे

—: भांडवल :—

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ३४,००,००० वर |
| गंगाजळी | रु. | १६,६०,००० |
| कार्यान्वित भांडवल | रु. | सोळा कोटींचे वर |

महाराष्ट्र, आंध्र व म्हैसूर राज्यांत ५२ शाखा

अधिक माहितीसाठी मुख्य कचेरी वा शाखांकडे चौकशी करावी.

मुख्य कचेरी बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग, जनरल मॅनेजर.


**बुलढाणा येथें साखरेचा कारखाना**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत विदर्भांत बुलढाणा जिल्ह्यांत साखरेचा सहकारी कारखाना काढण्यांत यावयाचा आहे. बुलढाण्यापासून १४ मैलावर असलेल्या चिखली ह्या गांवाची कारखान्यासाठी निवड करण्यांत आली आहे. विदर्भांतील हा पहिलाच सहकारी साखर कारखाना असून त्यासाठी १ कोटी रुपये भांडवल लागेल.

**आदिवासी जमातींची सुधारणा**— मध्यप्रदेशांतील आदिवासी जमातींची सुधारणा घडवून आणण्यासाठी मध्यप्रदेश सरकारनें आपल्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत १४ कोटी रुपयांची तरतूद केली आहे त्यापैकी ४५ टक्के रक्कम आर्थिक विकासावर, ३५ टक्के रक्कम शिक्षणावर, १० टक्के आरोग्य-योजनांवर, ५ टक्के नव्या रस्त्यांवर आणि बाकीची इतर कामावर खर्च करण्यांत येणार आहे.

**नव्या प्रकारचा रंग**— उत्तर ब्रिटनमधील एका कंपनीनें दोन वर्षे संशोधन करून एक नवा रंग तयार केला आहे. हा रंग लावतांना अगर नंतरहि त्याचा वास येत नाहीं. ब्रिटनमधील अन्न-पदार्थांचे कारखानदार, इस्पितळें, इत्यादींनी तो वापरण्यासहि सुरवात केली आहे. रंग पांच ते सात वर्षे पर्यंत टिकून राहण्याची हमी आहे.

**तेलाची वाहतूक करण्यासाठी नळ**— आसाममधील नहोरकटिआ येथील तेलाच्या खाणींतील तेल बिहारमधील बरौनी येथील तेलशुद्धीच्या कारखान्यापर्यंत नेण्यासाठी नळ घालण्याचे काम सुरू झाले आहे. एकूण ७२० मैल लांबीचे नळ घालण्यांत येणार आहेत. त्यापैकी २७० मैलांचें काम १९६१ नोव्हेंबरअखेर पूर्ण होईल.

**संयम राखण्याचा उपदेश**—गया येथें प्रार्थनेच्या सभेंत बोलतांना आचार्य विनोबा भावे म्हणाले कीं, अलीकडच्या काळांत लोकसंख्येची वाढ अतिशय झपाट्यानें होत आहे. अशा वेळीं लोकांनीं संयमानें वागण्यास शिकले पाहिजे. संपत्ति अगर ती निर्माण करण्याचीं साधनें जोंपर्यंत मर्यादित आहेत तोंपर्यंत मन:संयमन केल्याशिवाय संघर्ष व भांडणें अनिवार्य आहेत.

**गोव्याशीं व्यापार करण्याची परवानगी?**—पुढील महिन्यापासून भारत सरकार गोव्याशीं व्यापार करण्याची परवानगी मर्यादित स्वरूपांत देण्याचा संभव आहे. कापड, हस्तव्यवसायाच्या वस्तू, डाळी व गोव्यांत मागणी असलेले इतर कांहीं अन्नपदार्थ, औषधें, पुस्तकें व फिल्म्स इतक्या पुरतीच परवानगी देण्यांत येणार आहे. व्यापारबंदीमुळें गोवा सरकारला फारशी तोशीस लागलेली नाहीं.

**अणुशास्त्रज्ञाचा गौरव**—अणुशक्तीच्या शांततामय उपयोगाबाबतचे १९६१ सालचें बक्षीस सर जॉन कॉक क्रॉफ्ट ह्यांना देण्यांत आलें आहे. हें बक्षीस सुप्रसिद्ध मोटार कारखानदार हेन्री फोर्ड ह्यांच्या स्मरणार्थ ठेवण्यांत आलेलें आहे. बक्षिसांत ७५,००० डॉलर्सच्या निधीचा अंतर्भाव आहे. बक्षीसाचें प्रतीक म्हणून त्यांना एक सोन्याचें पदक देण्यांत येईल.

**पृथ्वी ते मंगळ प्रवास**— अमेरिकेंतील एका प्रसिद्ध एंजिनिअरिंग कंपनीच्या उपाध्यक्षानें असें भविष्य वर्तविलें आहे कीं येत्या १२ वर्षांच्या काळांत माणसाला मंगळावर घेऊन जाणारा व तेथून परत पृथ्वीवर आणणारा शक्तिशाली अग्निबाण तयार करण्यांत शास्त्रज्ञांना यश येईल. ही कंपनी पूर्वी विमानें तयार करीत असे. पण अलीकडे अमेरिकन सरकारसाठी ती दूर पल्ल्याचे अग्निबाण तयार करीत असते.

### आधुनिक शेतीसाठी पश्चिम जर्मनीचें साह्य

पश्चिम जर्मनीमधील शेतकी तज्ज्ञांचें एक मंडळ सध्यां भारताचा दौरा करीत आहे. भारतामधील शेतीचें उत्पन्न वाढविण्यासाठी जर्मनीला काय मदत देतां येईल ह्याचा अभ्यास मंडळ करीत आहे. जर्मनीमधील शेतीच्या पद्धतीवर आधारलेली शेती भारतांत करण्यासाठी हिमाचल प्रदेशांतील एखाद्या जिल्ह्याची निवड मंडळातर्फे करण्यांत येण्याचा संभव आहे. पश्चिम जर्मनींतील दक्षिणेच्या भागांतलि भौगोलिक व हवामानविषयक परिस्थिति याशीं बरीच जुळती असल्यानें ही निवड करण्यांत येण्याची शक्यता आहे. भारत सरकारच्या अन्न व शेतकी खात्यातर्फे हा प्रयोग करण्यांत येणार आहे. प्रयोगासाठी भारतामधील सात जिल्ह्यांची तात्पुरती निवड करण्यांत आली आहे. ज्या ठिकाणीं जें पीक उत्तम येतें त्याच ठिकाणीं त्याची लागवड करणें हा ह्या प्रयोगाचा गाभा आहे. प्रयोग कोणत्या जिल्ह्यांत करावयाचा हें निश्चित झाल्यावर त्या ठिकाणीं काम करण्यासाठी पश्चिम जर्मनीचें सरकार आपले तज्ज्ञ पाठविणार आहे. सुधारलेलें बियाणें, खतें, कीटनाशक औषधें आणि शेतीचीं आधुनिक अवजारें वापरून अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न ते करतील. शेतीचें उत्पन्न वाढविण्याच्या कामीं पश्चिम जर्मनींत छोट्या शेतांवरच अधिक भर देण्यांत येत असतो. ह्याच जर्मन पद्धतीनें अन्नधान्याचें उत्पादन वाढेल असा जर्मन तज्ज्ञांचा विश्वास आहे. ह्या कार्यक्रमासाठी पश्चिम जर्मन सरकार किती मदत देणार तें अद्याप ठरावयाचें आहे. शेती सुधारणेच्या ह्या कार्यक्रमाची व्याप्ति व त्यासाठी लागणारें साह्य ह्यासंबंधीं एक तांत्रिक अहवाल वरील मंडळ भारत सरकारकडे पाठविणार आहे. त्यानंतर सरकार निर्णय घेईल.

---

### हिंदमधील चालू औद्योगिक क्रांतीचें स्वरूप

भारत सरकारचे उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनीं सुरत चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेच्या खास बैठकीपुढें भाषण करतांना हिंदमधील चालू औद्योगिक क्रांतीविषयीं कांहीं विचार व्यक्त केले आहेत. आपल्या भाषणांत ते म्हणाले कीं, भांडवलदार–कारखानदारांनी आपले उद्योगधंदे चालवितांना उत्पादनाकडे व कार्यक्षम कारभाराकडे अधिक लक्ष पुरवून गुंतलेल्या भांडवलापासून अधिकाधिक उलाढाल करण्याकडे लक्ष पुरविलें पाहिजे. सध्यां भारत एका विशिष्ट प्रकारच्या औद्योगिक क्रांतीच्या काळांतून जात आहे. क्रांतीची गुणवत्ता व व्याप बराच मोठा आहे. गेल्या १० वर्षांत, विशेषतः गेल्या पांच वर्षांत, ह्या औद्योगिक क्रांतीसाठी लागणारा बळकट पाया घालण्यांत यश मिळालें आहे. अगदीं थोड्या कालावधींत फार मोठा औद्योगिक विस्तार करण्याचें काम भारतानें अंगावर घेतलें आहे. जगांतील कोणत्याहि देशांत कधींहि एवढें मोठें काम अंगीकृत करण्यांत आलेलें नाहीं. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत भारतानें उद्योगधंद्यांत ७५० कोटी रुपयांची रक्कम गुंतविली. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत भांडवलाची गुंतवणूक २,५०० कोटी रुपये करण्यांत आली. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ४,५०० ते ४,८०० कोटी रुपये गुंतविण्यांत येतील असा अंदाज आहे. कांहीं थोड्या वर्षांच्या अवधींत हिंद हा देश कापडाची मोठ्या प्रमाणावर निर्यात करूं लागला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळांत साखरेचें उत्पादन चौपटीनें वाढलें आहे. देशांतील १४ घटक राज्यांत प्रत्येकी एक रासायनिक खताचा कारखाना काढण्याचें घाटत आहे. अशा प्रत्येक कारखान्याला २० कोटी रुपये भांडवल लागेल.


## भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४३ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ११,००० |

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष

रावसाहेब य. द. खोले

श्री. गो. बा. देवी — श्री. बा. ग. धंदुके

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर ( जि. नाशिक ) (६) खोपोली ( जि. कुलाबा ).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४२,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्हज् | रु. १,२८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर

## महाराणी लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूलला पहिलें बक्षिस

### बचत कार्यांत उच्चांक

कोल्हापूर जिल्ह्यांतील ज्या हायस्कूलमधील जास्तींत जास्त विद्यार्थि-विद्यार्थिनी भाग घेतील व जास्तींत जास्त रक्कम बचत योजनेंत गुंतवतील त्या हायस्कूलला एक फिरती ढाल देण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या धोरणानुसार कोल्हापूर येथील महाराणी लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूलनें बचत योजनेच्या बाबतींत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल या हायस्कूलला १९५९-६० सालचें पहिलें बक्षिस म्हणून फिरती ढाल मिळाली आहे.

१९५६ सालापासून या संस्थेंत अल्प बचत योजना मोठ्या उत्साहानें चालू आहे. संस्था अधिकृत एजंट असून, मिळणारें कमिशन शाळेंत जमा होतें. विद्यार्थिनी, नातलगांनीं दिलेल्या खाऊच्या पैशांतून व स्वत: केलेल्या काटकसरींतून शिलकी असलेल्या पैशांतून अल्प बचतीचीं तिकिटें शिक्षकांमार्फत घेतात. अशा विद्यार्थिनींचीं कार्डें वर्गशिक्षकांकडे असतात. संस्थेंत सध्यां ५६१ कार्डधारक विद्यार्थिनी आहेत. सर्टिफिकिटांइतकी रक्कम झाल्याबरोबर तीं मुलींच्या नांवानें खरेदिलीं जातात. पालकांचें या योजनेस सक्रिय साह्य आहे. शाळेंत दिलीं जाणारीं बक्षिसें व स्कॉलरशिप्सपैकी कांहीं रकमा सर्टिफिकिटांत गुंतवलीं जातात. शिक्षकांनींहि या योजनेस हातभार लावला आहे. विद्यार्थिनींनीं रु. १,८४४-७५ इतकी रक्कम अल्प बचत योजनेंत गुंतवली असून शिक्षकांनीं रु. २,९५० व पालकांनीं रु. २,००० गुंतवली आहे.

---

## विजेच्या भारी यंत्रसामुग्रीची निर्यात

भोपाळ येथें विजेची भारी यंत्रसामग्री तयार करण्याचा कारखाना उभारण्यांत आला आहे. पुढील वर्षापासून हा कारखाना आपली सर्व उत्पादनक्षमता उपयोगांत आणूं लागेल. भारताचें औद्योगीकरण करण्याच्या कामीं ह्या कारखान्याला महत्त्वाचें स्थान आहेच. पण कारखान्यांत तयार होणाऱ्या मालापैकी कांहीं आग्नेय आशिआ व पश्चिम आशिआ ह्या भागांतील देशांत निर्यात करण्याचे प्रयत्न चालू आहेत. ह्या देशांतून त्यांच्या गरजासंबंधीं विचारणा करण्यांत येत आहेत. त्यांना योग्य तो प्रतिसाद मिळाला तर भारत चालू वर्षांत २५ ते ३० लाख रुपये किंमतीचा माल त्या देशांना निर्यात करूं शकेल. ह्या देशांत कारखान्यांत तयार होणारा माल निर्यात करण्याची शक्यता अजमावण्यासाठी एखादा खास अधिकारीहि पाठविला जाण्याचा संभव आहे. सध्यां कारखाना स्विच गिअर्स व ट्रॅन्सफॉर्मर्स निर्यात करूं शकतो. ह्या मालाच्या किंमती इतर देशांच्या मालाशीं स्पर्धा करण्यासारखा असून त्यांचा दर्जाहि चांगला आहे. चालू आर्थिक वर्षांत भोपाळच्या कारखान्यांतून ३·५ कोटी रुपये किंमतीचा माल तयार होईल. १९६२-६३ सालीं ९·५ कोटी रुपये किंमतीचा माल तयार होईल. १९६३-६४ सालीं २५ कोटी रुपयांचा माल तयार होईल. १९६४-६५ सालीं आणखी तितक्याच किंमतीचा तयार होईल व तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस ३१ कोटी रुपयांचा माल तयार होईल, असा अंदाज आहे. इतकें उत्पादन होण्यासाठी कारखान्याचा विस्तार करण्यांत यावयाचा आहे. त्यासाठी १२ कोटी रुपयांचें भांडवल लागेल. उत्पादन-विस्ताराच्या योजनेसाठी लागणारें परदेशीय चलन ब्रिटनकडून मिळणार आहे.

---

## Co-operation and Accountancy Deploma Board, Poona-1.

The under-mentioned candidates are hereby declared by the Co-operation and Accountancy Deploma Board as to have passed the G. D. C & A. Examination held in the month of October 1960.

### (1) POONA CENTRE

Passed in the whole Examination including those who have passed in one or the other part previously.

*First Class* — *NIL* *Second Class* — *NIL*

**Pass Class**

| *Seat No.* | *Name* |
|---|---|
| 10 | Shri B. N. Kadam |
| 11 | Shri M. M. Majumdar |
| 12 | Shri H. M. Pathan |
| 19 | Shri G. M. Kelkar |
| 20 | Shri K. G. Mhaiskar |
| 28 | Shri M. S. Gajandragadkar |
| 29 | Shri B. A. Naik |

### (2) AHMEDABAD CENTRE

| *Seat No.* | *Name* |
|---|---|
| 3 | Shri K. J. Trivedi |

### (3) POONA CENTRE

**Passed in Co-operation Group Only**

| | |
|---|---|
| 2 | Shri R. E. Mudaliar |
| 3 | Shri M. D. Patil |
| 8 | Shri M. G. Gore |

### (4) POONA CENTRE

**Passed in Accountancy Group Only**

| | |
|---|---|
| 16 | Shri J. S. Deshpande |
| 25 | Shri N. Y. Shrigondekar |

(5) The following candidates have secured exemptions as detailed below:

| *Seat No.* | *Name* | *Paper No.* |
|---|---|---|
| 9 | Shri V. R. Gholap | II & IV of Co-operation Group |

(6) In addition to above, the following candidates are declared to have passed the full G. D. C. & A. Examination in persuance of the Rosolution passed by the G. D. C. & A. Board in its meeting held on 28-12-1960.

(1) Shri I. A. Dalvi (2) Shri A. A. Kathiria.

Sd/- **L. N. Bongirwar,**
Registrar and Chairman.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

प्रियजनांना द्यावयाची भेट कशी असावी ?

सतत नवा आनंद देत राहणारी !

श्री. वा. काळे ह्यांचें अवीट साहित्य

| | |
|---|---|
| कण आणि क्षण | रु. १=५० |
| पुढें पाऊल | रु. १=०० |
| तुमचें स्थान कोणतें ! | रु. १=०० |

ही भेट देऊन आपली गुणज्ञता व्यक्त करा.

## जमिनींचें कमाल धारणा क्षेत्र

### महाराष्ट्र सरकारच्या विलांतील योजना

[ या विधेयकामध्यें राज्यांतील शेतजमिनीच्या कमाल धारणेवर मर्यादा घातली जाणार असून जादा जमीन ताब्यांत घेऊन ती भूमिहीनांना, छोट्या धारकांना, सहकारी संस्थांना वांटण्याचीहि त्यांत तरतूद आहे. विधेयकांतील कमाल क्षेत्र, नुकसानभरपाईचा दर आणि त्याबद्दल मिळावयाचे रोखे ह्याविषयीं तरतुदी पुढें दिल्या आहेत. ]

### जमिनीचें कमाल क्षेत्र

विधेयकान्वयें निश्चित केलेली जमिनीची कमाल मर्यादा, जी जमीन-मालक वा कूळ यांच्या कायदेशीरपणें ताब्यांत असेल तिला लागू होईल. जमीन या शब्दाचा अर्थ "शेत-जमीन" वा "चराईत जमीन" ( कुरण ) तसेंच, गौळीवाड्यासाठी व कोंबडीपालन किंवा पशुपालन यांसाठी वापरली जाणारी जमीन असा केला जाईल. जमिनींचे चार प्रकार पाडण्यांत आले आहेत. ते असे :—

### जमिनींचे चार प्रकार

( १ ) सरकारच्या कोणत्याहि योजनेद्वारां हंगामांत आणि कायम पाणीपुरवठा केल्या जाणाऱ्या जमिनी;

( २ ) हंगामानुसार पाणीपुरवठा केला जाऊन दुबार पीक येणारी जमीन, म्हणजे सरकारच्या कोणत्याहि योजनेद्वारां वर्षांतून दोन हंगाम म्हणजे आठ महिने निश्चितपणें भिजणारी जमीन;

( ३ ) हंगामी पाणीपुरवठा होणारी एका पिकाची जमीन, म्हणजे कोणत्याहि सरकारी योजनेद्वारां निश्चित पाणीपुरवठा वर्षाकांठीं एका हंगामांत म्हणजे चार महिने पाणीपुरवठा होणारी जमीन;

( ४ ) जिरायती जमीन; म्हणजे बाकीची सर्व जमीन.

जमीनधारकांनीं स्वतः खोदलेल्या विहिरी व इतर सोयींतून पाणीपुरवठा होणाऱ्या जमिनी व भात जमिनी यांचा समावेश या विधेयकांत जिरायती जमिनी म्हणून करण्यांत आला आहे. मुंबई उपनगर जिल्हा, ठाणें, कुलाबा व रत्नागिरी या समुद्रकांठच्या जिल्ह्यांच्या बाबतींत मात्र वरकस जमीन वेगळा प्रकार म्हणून गणली जाणार असून त्यासाठी कमाल धारणमर्यादा जास्त ठेवली आहे.

### कमाल मर्यादा क्षेत्र

कमाल मर्यादा क्षेत्रें निश्चित करण्यासाठी राज्याचे ७४ विभाग पाडण्यांत आले आहेत. जिरायती जमिनींसाठी निश्चित केलेली कमाल मर्यादा स्थानिक क्षेत्रांनुसार ८४ ते १५६ एकर आहे. वर सांगितलेल्या पाणीपुरवठ्याखालील जमिनीच्या तीन प्रकारांबाबत सर्व राज्यभर तेंच कमाल मर्यादा क्षेत्र पुढीलप्रमाणें निश्चित करण्यांत आलें आहे :—

| जमीन | कमाल मर्यादा एकर |
|---|---|
| ( १ ) कायम पाणीपुरवठ्याची | १६ |
| ( २ ) दुबार पिकाची हंगामी पाणीपुरवठ्याची | २४ |
| ( ३ ) एका पिकाची हंगामी पाणीपुरवठ्याची | ४८ |

ही कमाल मर्यादा पांच माणसें असलेल्या कुटुंबासाठी आहे. अधिक मोठ्या कुटुंबासाठी प्रत्येक कुटुंबसदस्यामागें पांचपेक्षा अधिक असणाऱ्या कमाल मर्यादाक्षेत्राच्या एक-षष्टांश इतकी जमीन अधिक देण्याची तरतूद आहे. मात्र जास्तींत जास्त ती दोन कमाल मर्यादा क्षेत्रांइतकीच असावी.

कुटुंबातील सभासद म्हणजे वडील, आई, पत्नी, भाऊ, मुलगा, नातू अथवा अवलंबित बहीण अगर भाऊ आणि हिंदु अविभक्त कुटुंबांच्या बाबतींत अशा कुटुंबांचा सभासद.

### नुकसानभरपाईचा दर

कमाल धारणा क्षेत्रापेक्षा अधिक असणाऱ्या जमिनींसाठी याव-याची नुकसानभरपाई आकारणीच्या बहुगुणक संख्येच्या स्वरूपांत निश्चित करण्यांत आली आहे. प्रत्येक स्थानिक विभागांतील जिराईत पिकाच्या क्षेत्राच्या एकरीं किंमतीचा दर पहिल्या परिशिष्टांत देण्यांत आला आहे. हा दर, आकारणीच्या ५५ पट ते आकारणीच्या १९५ पट असेल. निरनिराळ्या जिल्ह्यांत असलेल्या जमिनीच्या सरासरी किंमती, त्या भागांतील आकारणीची कमाल मर्यादा आणि इतर संबंधित घटक लक्षांत घेऊन हे दर निश्चित करण्यांत आले आहेत.

बागाईत जमिनींच्या तिन्हीं प्रकारांसाठी ठरविण्यांत आलेला नुकसानभरपाईबाबतचा दर देखील प्रत्येक एकरावरील आकारणी-च्या दरावर आधारीत आहे; परंतु त्यांच्या बाबतींत, अशा जमिनींना मिळणाऱ्या पाटबंधाऱ्यांच्या सोयींना महत्त्व देण्यांत आलें आहे. ह्या तीन प्रकारच्या क्षेत्रांसाठी निश्चित करण्यांत आलेली नुकसानभरपाई पुढीलप्रमाणें आहे :—

( १ ) बारमाही बागाईत असणाऱ्या जमिनीच्या बाबतींत कोरडवाहू पिकाची जमीन म्हणून अंदाजिण्यांत आलेल्या दरांत ५० टक्के वाढ.

( २ ) हंगामी बागाईत जोड पिकांच्या जमिनीच्या बाबतींत कोरडवाहू पिकाची जमीन म्हणून अंदाजिलेल्या दरांत २५ टक्के इतकी वाढ.

( ३ ) हंगामी बागाईत एकरीं पिकाच्या क्षेत्राच्या बाबतींत कोरडवाहू पिकाची जमीन म्हणून अंदाजिण्यांत आलेल्या दरांत १० टक्के इतकी वाढ.

सरकारकडून मक्त्यानें घेतलेल्या जमिनीच्या बाबतींत नुकसान-भरपाईहि, कोरडवाहू पिकाची जमीन म्हणून संबंधित जमिनीच्या किंमतीच्या १० टक्के अगर उपरोल्लेखित ( १ ), ( २ ) अगर ( ३ ) च्या धर्तीवर अंदाजिण्यांत आलेल्या किंमतीच्या १० टक्के इतकी राहील.

### नुकसानभरपाईची विभागणी

उपरोल्लेखित किंमतीव्यतिरिक्त, क्षेत्रांतील कोणत्याहि इमारती, विहिरी, बांध, कायम स्वरूपाची मालमत्ता, झाडें, वगैरेंची किंमत मिळण्यास जमीनधारक पात्र राहील. एखाद्या व्यक्तीनें कूळ म्हणून कोणतीहि जमीन धारण केलेली असेल तर कूळ व जमीनमालक यामध्यें पुढीलप्रमाणें नुकसानभरपाई विभागण्यांत येईल :—

( १ ) $\frac{1}{3}$ इतकी नुकसानभरपाई जमीनमालकास दिली पाहिजे.

( २ ) $\frac{2}{3}$ इतकी नुकसानभरपाई कुळाला दिली पाहिजे.

### रक्कम ३% व्याजाच्या रोख्यांत मिळणार

नुकसानभरपाईची रक्कम, ही दरसाल दरशेंकडा ३ टक्के इतकें व्याज असणाऱ्या, बदलून देतां येणाऱ्या, रोख्यानें दिली जाईल. हे रोखे रु. ५०, १००, २००, ५००, १,००० आणि १०,००० या क्रमानें असतील. सदर रोखे दोन प्रकारचे—म्हणजे एक रोखे २० वर्षांच्या काळांत मूळ रक्कम आणि व्याज यांच्या समीकृत वार्षिक हप्त्यानें परत करावयाचे आणि दुसरे रोखे, रोखे दिल्याच्या तारखेपासून २० वर्षांच्या शेवटीं सोडवून घेण्याचें—अशा प्रकारचे असतील.

# विविध माहिती

**लग्नासाठी ४ लाख रुपये हवेत**—मध्य प्रदेशांतील पूर्वीच्या बस्तार संस्थानचे अधिपति महाराजा प्रवीणचंद्र ह्यांचा विवाह राजस्थानमधील एका राजकन्येशीं ठरला आहे. विवाहसमारंभ साजरा करण्यासाठी महाराजातर्फे ४ लाख रुपयांची मागणी करण्यांत आली आहे. सध्यां त्यांच्या मालमत्तेचा कारभार कोर्ट ऑफ वॉर्डसमार्फत आहे. खर्चाला मंजुरी मिळावी म्हणून मध्यप्रदेश सरकारकडे अर्ज करण्यांत आला आहे.

**संपत्तीचें विकेंद्रीकरण करा**—मध्यवर्ती सरकारचे व्यापार व उद्योगमंत्री श्री. लाल बहादुरशास्त्री एका प्रसंगीं बोलतांना म्हणाले कीं, लोकांच्या मागण्या लक्षांत घेऊन सरकारनें सत्तेचें व कारभाराचें विकेंद्रीकरण केलें आहे. आतां भांडवलदारांनीं लोकांच्या मागण्यास मान देऊन आपल्या संपत्तीचें विकेंद्रीकरण करावें. त्यांनीं आपल्याजवळील पैसा मोठ्या व छोट्या उद्योगधंद्यांत गुंतवावा.

**तेल शोधण्यांत यश**—आसाममध्यें रुद्रसागर येथें तेलासाठी खोदण्यांत येणाऱ्या एका विहिरींत तेल सांपडलें आहे. विहिरीपासून मिळणाऱ्या तेलाचा नक्की अंदाज अद्याप लागलेला नाहीं. पण, गुजरातमधील खंबायतच्या विहिरीपेक्षा रुद्रसागर येथें अधिक तेल सांपडण्याचा संभव आहे. दक्षिण भारतांत कावेरी नदीच्या खोऱ्यांतहि तेलाचा शोध चालू आहे.

**कांडला येथील मुक्त-व्यापार विभाग**—मध्यवर्ती सरकारचे अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई ह्यांनीं कांडला बंदराला भेट दिली. ह्या बंदरानजीक स्थापन करण्यांत येणाऱ्या मुक्त-व्यापार विभागाला जरूर तें सर्व साह्य करण्यास सरकार तयार असल्याचें त्यांनीं सांगितलें. मुक्त-व्यापार विभाग व नजीकची औद्योगिक वसाहत ह्यांच्यामुळें उद्योगधंद्यांना चांगली संधि लाभली आहे.

**रशिआची नेपाळला मदत**—रशिअन तज्ज्ञांची मदत घेऊन नेपाळचें सरकार एक साखरेचा कारखाना व एक सिगारेटचा कारखाना काढणार आहे. कारखाने उभारण्याच्या खर्चापैकीं कांहीं खर्चहि रशिआ सोसणार आहे. त्याशिवाय नेपाळमध्यें पूर्व-पश्चिम रस्ता बांधण्याचे कामीं आणि जलविद्युत्केंद्र उभारण्याचे कामींहि रशियन एंजिनिअर्स मदत करणार आहेत.

**भारताची आर्थिक कुंडली**—अलाहाबाद येथें हिंदमधील विकास योजनांबद्दल बोलत असतांना पंतप्रधान पं. नेहरू म्हणाले कीं, कुंडली धरून एखाद्या व्यक्तीचें भवितव्य जसें समजतें त्याचप्रमाणें भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमावरून देशाचें भवितव्य समजतें. एका अर्थानें हा कार्यक्रम म्हणजे भारताची आर्थिक कुंडलीच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

**तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या मसुद्यांत ठरविण्यांत आलेल्या खर्चापेक्षा २९० कोटी रुपये अधिक खर्च करण्यांत येण्याचा संभव आहे. ह्या रकमेपैकीं १२० कोटी रुपयांची रक्कम मध्यवर्ती सरकारच्या खर्चांत वाढेल व बाकीची १७० कोटी रुपयांची रक्कम राज्य सरकारांच्या खर्चांत वाढेल. मध्यवर्ती सरकारच्या खर्चांत होणारी वाढ औद्योगिक शक्तीच्या योजनांमुळें होईल.

**ब्रिटनचा बोटी बांधण्याचा धंदा**—१९६० सालीं ब्रिटनमधील बोटी बांधण्याच्या धंद्यानें चांगली कामगिरी केली; परंतु ह्या वर्षी बांधण्यांत आलेल्या बोटींच्या मागण्या तीन वर्षांपूर्वी नोंदविण्यांत आलेल्या होत्या. १९६० अखेर मात्र ब्रिटनमधील बोटींच्या कारखान्यांच्या उत्पादनक्षमतेच्या सुमारें निम्म्या उत्पादनक्षमतेला काम मिळण्याइतक्याच मागण्या आलेल्या आहेत.

**रवींद्रनाथ टागोरांचे ग्रंथ**—कविवर्य रवींद्रनाथ टागोर ह्यांच्या शंभराव्या जन्मदिनानिमित्त रशियानें त्यांचे ग्रंथ १२ खंडांत प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. जन्मदिन साजरा करण्यासाठी एक कमिटी स्थापन करण्यांत आली आहे. रशिआंतील सेर्डोपार्डीहि अशा कमिट्या स्थापन करण्यांत आल्या आहेत. ह्या निमित्तानें टागोरांच्या कांहीं नाटकांचे प्रयोगहि करण्यांत येणार आहेत.

**चहाविषयक संशोधन केंद्र**—कोइमतूरजवळील चहाच्या मळ्याच्या भागांत चहाविषयक संशोधन करणारें एक केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे. ह्या संशोधन शाळेचा पायाचा दगड मध्यवर्ती सरकारचे व्यापारमंत्री श्री. नित्यानंद कानुगो ह्यांनीं बसविला. संशोधन शाळेसाठी १३ लाख रुपये खर्च येणार आहे. भारतांत अशा प्रकारचें हें पहिलेंच केंद्र आहे.

**गुजरातचा तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम**—गुजरात राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची रक्कम २३० कोटी रुपयांवरून २३५ कोटी रुपये करण्यांत आली आहे. मध्यवर्ती सरकारकडून गुजरात राज्याला १०८ ऐवजीं ११३ कोटी रुपयांपर्यंत मदत मिळेल व बाकीची १२२ कोटी रुपयांची रक्कम गुजरातला उभारावी लागेल असा अंदाज आहे.

**चीनला दुष्काळाचा जबर तडाखा**—चीनमधील शेतीची अवस्था नैसर्गिक आपत्तींमुळें अतिशय बिकट झाली आहे. १९६१ सालीं चीनला मोठ्या दुष्काळाला तोंड द्यावें लागणार अशीं चिन्हें दिसत आहेत. पश्चिम युरोपांतील तज्ज्ञांनीं केलेल्या अंदाजाप्रमाणें चीनमधील अन्नधान्याच्या उत्पादनांत ३३ टक्के घट येण्याची शक्यता आहे. तसें झाल्यास ती फार मोठी आपत्ति ठरेल.


वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४१ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००

बचतीच्या आकर्षक योजना

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | „ ३॥ „ |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | „ ५ „ |

*मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

# रिझर्व्ह बँक आणि चलनवाढ

**महागाई एकसारखी वाढत आहे त्याला मुख्य कारण राष्ट्रीय उत्पन्नांत, विशेषतः अन्नधान्यांच्या उत्पादनांत, समाधानकारक वाढ होत नाहीं, हेंच होय. रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाच्या योजना उत्पादन-वाढीच्या अभावीं प्रभावकारक ठरत नाहींत आणि चलनवाढीला त्या आळा घालूं शकत नाहींत.**

रिझर्व्ह बँक ही भारताची मध्यवर्ती बँक आहे. तिचें आर्थिक क्षेत्रांतील महत्त्व अनन्यसाधारण आहे. सामान्य नागरिकाचा त्या बँकेशीं महागाईमुळें हरघडी संबंध येतो; चलनविस्तार तिच्या द्वारांच होतो. ठेवीदारांचा तिच्याशीं संबंध येतो, तो अप्रत्यक्ष असतो; कारण ज्या व्यापारी बँकांत ते ठेवी ठेवतात, त्या बँकांवर रिझर्व्ह बँक अधिकाधिक कडक नियंत्रण ठेवून ठेवीदारांचें हित-संरक्षण करण्यास ती झटत असते. प्रत्येक देशांतच रिझर्व्ह बँके-सारखी एक मध्यवर्ती बँक असते.

### रिझर्व्ह बँकेचें स्वरूप

भारताची रिझर्व्ह बँक १९३५ मध्यें स्थापन झाली. रिझर्व्ह बँकेची मूळ स्थापना भागिदारांची बँक म्हणून झाली; तिचे ५ कोटि रु. चें शेअरभांडवल होतें. तिच्या कार्याचें सार्वजनिक महत्त्व लक्षांत घेऊन त्याप्रमाणें तरतुदी करण्यांत आल्या.

रिझर्व्ह बँकेचें धोरण सरकारी धोरणाशीं सुसंगत असावें, ह्या दृष्टीनें स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लागलीच तिचें राष्ट्रीयीकरण करण्याचें ठरविण्यांत आलें. युद्धोत्तर काळांत कित्येक युरोपियन मध्यवर्ती बँका, त्याचप्रमाणें बँक ऑफ इंग्लंड आणि बँक ऑफ फ्रान्स ह्यांचेंहि राष्ट्रीयीकरण झालें होतें; त्यांचा दाखला पुढें होताच. १ जानेवारी, १९४९ पासून रिझर्व्ह बँक सरकारी मालकीची बनली. सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें योग्य वाटतील त्या गोष्टी रिझर्व्ह बँकेला करायला लावण्याचा अधिकार मध्यवर्ती सरकारला देण्यांत आला.

### बँकेचा कारभार

रिझर्व्ह बँकेचा कारभार मध्यवर्ती बोर्ड ऑफ डायरेक्टर्सकडे आहे; त्याचे १५ सभासद असतात, गव्हर्नर, तिघे डेप्युटी गव्हर्नर्स, नेमलेले दहा डायरेक्टर्स आणि एक सरकारी अधिकारी अशांचें तें बोर्ड असतें. ह्या मध्यवर्ती बोर्डाच्या, वर्षातून किमान सहा तरी सभा व्हाव्या लागतात. सोयीसाठी, बोर्डानें कांहीं कामें एका कमिटीकडे सोंपविलीं आहेत. तिच्या सभा दर आठवड्याला होतात. मध्यवर्ती बोर्डाचा चेअरमन आणि बँकेचा प्रमुख कार्य-कर्ता म्हणजे गव्हर्नर होय; बँकेला असलेले सर्व अधिकार गव्हर्नरलाच प्राप्त झालेले असतात; मध्यवर्ती बोर्डानें कांहीं नियमन केले, तर तें मात्र गव्हर्नरवर बंधनकारक असतें. बँकेचें मुख्य कार्यालय मुंबई येथें आहे.

### बँकेचीं मुख्य कामें

देशांतील चलनपद्धतीवर नियंत्रण ठेवून आर्थिक स्थिरता कायम राहण्यास मदत करणें आणि सरकारी धोरणाच्या चौक-टींत आर्थिक प्रगतीला साहाय्य करणें हें रिझर्व्ह बँकेचें प्राथमिक कार्य आहे. सहाजिकच, चलन, बँकिंग आणि पतपुरवठा ह्यांचें नियमन ओघानेंच आलें. चलनी नोटा काढण्याचा अधिकार फक्त तिलाच आहे; व्यापारी बँकांची आणि राज्य सहकारी बँकांची ती बँकर आहे. बँक रेट, ओपन मार्केट ऑपरेशन्स, बँकांच्या कर्जव्यवहारावर नियंत्रण, सरकारचीं बँकिंगचीं कामें, त्याचीं कर्जउभारणी, रुपयाची परदेशांतील किंमत कायम राखणें, इत्यादि तिच्याच कार्याचीं महत्त्वाचीं अंगें आहेत. शेतीला भरपूर कर्जपुरवठा करण्याचें महत्त्वाचें कार्य तिच्याकडे आहे. औद्योगिक कर्जाची वाढ करण्याचें कामहि तिनें पत्करलें आहे. मध्यवर्ती सरकारला महत्त्वाच्या आर्थिक बाबतींत सल्ला देणें हें रिझर्व्ह बँकेचें कर्तव्यच आहे.

देशाच्या आर्थिक गरजा लक्षांत घेऊन चलनाचा पुरवठा कमी-जास्त करावा लागतो; लोकांच्या हातांत किती चलन खेळावें हें रिझर्व्ह बँकेच्या हातांत असतें; त्याच्या नियंत्रणासाठी रिझर्व्ह बँकेजवळ वेगवेगळीं साधनें आहेत. तरीसुद्धां, सरकारच्या अर्थ-संकल्पाच्या परिस्थितीचा अनिवार्य परिणाम घडून येऊन रिझर्व्ह बँकेच्या अधिकाराला मर्यादा प्राप्त होते. आयात-निर्यातीचें व परदेशी कर्जाचें सरकारी धोरणहि रिझर्व्ह बँकेच्या मार्गांत येऊं शकतें. रिझर्व्ह बँकेच्या स्वतःच्या धोरणापेक्षा सरकारी धोरणच प्रभावी ठरतें; बँकेनें सरकारला किती चलन पुरवावें, ह्यावर कायद्याचें कसलेंहि बंधन नाहीं ! सरकारी सहकार्यावेरीज त्यामुळें रिझर्व्ह बँकेचें मूलभूत उद्दिष्ट साध्य होणार नाहीं.

### चलनविषयक धोरणाच्या मर्यादा

ह्याचा सरळ अर्थ असा कीं, सरकारनें तुटीचे अर्थव्यवहार केले तरी ते पुरें पाडायला लागणारें चलन रिझर्व्ह बँकेनें पुरवावेंच लागेल. सरकारनें कर्जाऊ पैसे मागितले, कीं ते रिझर्व्ह बँकेनें दिलेच पाहिजेत; त्यासाठी लागणारें चलन पुरविलें पाहिजे मग इकडे कितीका चलनवाढ होऊन महागाई होईना ! सरकारनें स्वतःच आपलें अंथरूण पाहून हातपाय पसरले नाहींत, तर रिझर्व्ह बँक सल्ला आणि इशारे देण्यापलीकडे कांहीं करूं शकणार नाहीं.

### कायद्याच्या तरतुदी शिथिल केल्या

चलनासंबंधींच्या कायद्याच्या तरतुदी येथें पाहणें उद्बोधक ठरेल. रिझर्व्ह बँकेचीं दोन खातीं आहेतः— ( १ ) इश्यू खातें आणि ( २ ) बँकिंग खातें. इश्यू खात्यांतील जिंदगीच्या तारणावर चलनी नोटा काढण्यांत येतात; ह्या तारणांत सोनें, विदेशी रोखे, सरकारी रोखे आणि रुपये ( रुपयांच्या नोटासुद्धां ) ह्यांचा समावेश होतो. एकूण जिंदगीपैकीं ४० टक्के जिंदगी सोनें आणि विदेशी सरकारी रोखे यांच्या स्वरूपांतच असायला हवी. सोनें किमान ४० कोटि रुपये किंमतीचें तरी हवें, अशी मूळ काय-द्यांत तरतूद होती. भारतांत स्वातंत्र्योत्तर काळांत झालेल्या आर्थिक उलाढालींच्या वाढीला चलनाचा पुरवठाहि अधिक लागूं लागला. रिझर्व्ह बँकेची परदेशी रोख्यांतील गुंतवणूक घटूं लागली. तेव्हां १९५६ मध्यें कायद्यांत दुरुस्ती करून, चलन आणि तारण ह्यांचें मूळ आवश्यक प्रमाण रद्द करून टाकण्यांत आलें आणि किमान ४०० कोटि रुपयांचे परदेशी रोखे, ११५ कोटि रुपयांचें सोनें किंवा दोन्हीं मिळून ५१५ कोटि रुपयांचें तारण असलें म्हणजे पुरें, असें ठरविण्यांत आलें. ह्या पूर्वींच्याच सोन्याची आतां रु. ६२–५० तोळ्याप्रमाणें किंमत करून ( पूर्वी ती रु २१–२४ तोळा होती ) जिंदगींतलें तेंच ४० कोटि रुपयांचें सोनें ११५ कोटि रुपयांचें करण्यांत आलें; इंटरनॅशनल मोनेटरी फंडानें ठरवून दिलेल्या अधिकृत दरानेंच ही किंमत ठरविण्यांत आली.

### रिझर्व्ह बँकेची असहायता

किमान ४०० कोटि रुपयांच्या ह्या रोख्यांची अटहि पुढें जाचक होऊं नये म्हणून शिथिल करण्यांत आली, त्यासाठीं १९५७ मध्यें एका ऑर्डिनन्सच्या द्वारां केलेल्या दुरुस्तीचें कायद्याच्या दुरुस्तींत रूपांतर करण्यांत आलें. इश्यू खात्यांतील सोनें व

सरकारी रोखे ह्यांची किंमत किमान २०० कोटि रुपये असली म्हणजे झालें, असें आतां ठरविण्यांत आलें. त्यांपैकीं ११५ कोटि रुपयांचें सोनें असावें असेंहि बंधन ठेवलें. ह्याचा अर्थ, विदेशी रोखे ८५ कोटि रुपयांचे असले तरी चालतील असा झाला. अनपेक्षित प्रसंगाला तोंड देतां यावें, ह्यासाठीं विदेशी रोख्यांतील तारणाच्या बंधनांतून मध्यवर्ती सरकारच्या पूर्वमंजुरीनें मुक्त होण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेला १९५७ च्या दुरुस्त कायद्यानें देण्यांत आलेला आहे. म्हणजे, विदेशी रोखे मुळींच नसले तरी आतां चालू शकेल. सोनें मात्र ११५ कोटि रुपयांचें हवें. ह्याचा अर्थ, मध्यवर्ती सरकारनें स्वतःचे रोखे पुढें करून कितीहि चलनी नोटा मागितल्या, तरी रिझर्व्ह बँकेला त्या पुरविणें भाग आहे. चलनवाढीला आळा सरकारनें घातला, तरच ठीक. रिझर्व्ह बँकेला सरकारी धोरणाविरुद्ध कांहींहि करतां येणार नाहीं. किंमती रोखून धरण्याचें महत्त्व तिनें कितीहि प्रतिपादन केलें तरी मध्यवर्ती सरकारच्या अर्थखात्यापुढें तिला नमावेंच लागेल. रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्याचा व सूचनांचा प्रभाव कां फारसा पडूं शकत नाहीं, हें ह्यावरून स्पष्ट होईल.

रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्यांतील पुढें दिलेल्या आंकड्यांवरून तिच्या चलनी नोटांनीं होत गेलेली वाढ आणि त्यांच्या तारणाचें बदलत गेलेलें स्वरूप, ह्यांची कल्पना येईल. तारणांपैकीं सोन्यांत वाढ झालेली नाहीं, विदेशी रोख्यांत घट होत गेली आहे आणि भारत सरकारच्या रोख्यांत खूपच वाढ झाली आहे. रुपयांचें नाणें ह्यांत जुलै १९४० नंतर छापलेल्या रुपयांच्या नोटांचाहि समावेश होतो, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. थोडक्यांत म्हणजे सरकारी वचनचिठ्ठ्यांच्या आधारावरच वाढता आर्थिक संसार मुख्यःत चालू आहे.

**चलनी नोटा व त्यांचें तारण ( आंकडे कोटि रुपयांचें )**

| वर्ष | एकूण चलनी नोटा | चलनी नोटांचें तारण | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | सोनें | विदेशी रोखे | रुपये व रुपयांच्या नोटा | भारत सरकारचे रोखे |
| १९५१–५२ ... | १,१७६ | ४० | ६०३ | ६९ | ४६४ |
| १९५२–५३ ... | १,१५० | ४० | ५७८ | ८२ | ४४९ |
| १९५३–५४ ... | १,२०३ | ४० | ६४८ | ९३ | ४२१ |
| १९५४–५५ ... | १,२९३ | ४० | ६४६ | १०२ | ५०३ |
| १९५५–५६ ... | १,४७८ | ४० | ६५६ | १०३ | ६७८ |
| १९५६–५७ ... | १,५३७ | ११७ | ४१२ | १२२ | ८८४ |
| १९५७–५८ ... | १,५८९ | ११७ | १७१ | १२९ | १,१७१ |
| १९५८–५९ ... | १,७१७ | ११७ | १७८ | १३० | १,२९१ |
| १९५९–६० ... | १,८६६ | ११७ | १६३ | १२४ | १,४६१ |

**शेतीच्या उत्पादनवाढीचें महत्त्व**

१९५०–५१ ते १९५२–५३ ह्या कालांत राष्ट्रीय उत्पन्न ७ टक्क्यांनीं वाढलें, अन्नधान्यांच्या उत्पादनांत १२ टक्के वाढ झाली आणि चलनपुरवठा १० टक्के कमी होऊन किंमती १२ टक्क्यांनीं उतरल्या. १९५२–५३ ते १९५५–५६ ह्या काळांत चलनपुरवठ्यांत २४ टक्के वाढ होऊन राष्ट्रीय उत्पन्न मात्र फक्त ११ टक्क्यांनीं सुधारलें. अन्नधान्याचें उत्पादन ५८३ लक्ष टनां-वरून ६५८ लक्ष टनांवर गेल्यामुळें किंमतींत ८ टक्के घट झाली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या चार वर्षांत चलनाचा पुरवठा २४ टक्क्यांनीं वाढून राष्ट्रीय उत्पन्न १४ टक्क्यांनीं सुधारलें. किंमतीचा दर्शकांक ( इंडेक्स ) इकडे एकसारखा वाढत राहिला. पैशाच्या पुरवठ्याच्या प्रमाणांत अन्नधान्यांचें उत्पादन झालें नाहीं. किंमतीचा दर्शकांक २५ टक्क्यांनीं वाढला. महागाईचें कारण चलनविषयक तर खरेंच; पण त्याचें मूळ शेतीच्या, विशेषतः अन्नधान्याच्या, अपुऱ्या उत्पादनांत अखेरीस आढळतें. हें उत्पादन पुरेसें वाढत नाहीं, ही खरी अडचण आहे.

**आर्थिक स्थैर्याला आवश्यक बाबी**

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत सरकारी अर्थसंकल्पाची एकूण तूट १२०० कोटि रुपये आहे. ह्या तुटीच्या व्यवस्थेलेरीज योजनेंतील किमान कामेंहि पार पाडत येणार नाहींत, असें त्यांचें समर्थन आहे. ही तूट अंशतः भरून काढण्यासाठीं जरी चलन वाढीचा अवलंब केला, तरी केवढी मोठी अडचण निर्माण होते ! मूळ अंदाजाप्रमाणें खर्च होत राहून कर आणि कर्जें ह्यांच्या द्वारां त्यांची तरतूद मात्र होत नाहीं आणि तूट भरून काढण्या साठीं कृत्रिम उपायांचाच अवलंब करावा लागतो. सरकारनें करवाढीसाठीं व करवसुलीसाठीं अप्रियता पत्करली नाहीं, तर भरमसाठ चलनवाढ अपरिहार्य होतें; त्याचें मग अप्रत्यक्ष, दूरगामी कांहींहि परिणाम होतात.

आर्थिक स्थैर्य टिकविण्याची प्राथमिक जबाबदारी सरकारची; त्या खालोखाल रिझर्व्ह बँकेची. परंतु जनतेमध्यें योग्य त्या गुणांचें संवर्धन होण्यावरच अखेर सर्व कांहीं अवलंबून राहातें. रिझर्व्ह बँकेची भूमिका यशस्वी होण्यास योग्य सरकारी धोरणाची कडक अंमलबजावणी व त्याला जनतेचें सहकार्य या दोहोंची आवश्यकता असते. जनतेचें सहकार्य सरकारवर अवलंबून राहतें आणि सरकार हें जनतेच्या पाठिंब्यावर आधारलेलें असतें, असें हें दुष्ट चक्र आहे.

" केसरी "मधील श्री. वा. काळे ह्यांचा लेख

---

**ओगले ग्लास वर्क्सचे भागांची शेअर बाजारांत खरेदी–विक्री**

ओगले ग्लास वर्क्स लि. चे भाग बॉंबे स्टॉक एक्सचेंजच्या लिस्टांत समाविष्ट करण्यांत आले आहेत. खरेदी–विक्री १०० भागांच्या गटानें होईल.

---

**४९५ रुपयांत रेल्वेनें कुठेंहि जा**

भारतांत कुठेंहि पहिल्या वर्गानें आणि एअर कंडिशण्डनें जाण्यास परदेशी प्रवाशाला आतां फक्त ४९५ रु. पडतील. परदेशी उतारूंना आकर्षण्यासाठीं ही सवलत आहे. १९५९ मध्यें १,०९,४६४ विदेशी प्रवाशांमुळें २० कोटी रु. परदेशी हुंडणावळ मिळाली होती.

---

**बँक ऑफ अमेरिकेचे प्रचंड व्यवहार**

बँक ऑफ अमेरिकेच्या ३१ डिसेंबर, १९६० च्या आंकड्यां-प्रमाणें, तिचेकडे १०,८०,५८, ९१,४५० डॉलर्सच्या ठेवी असून तिनें ६,६९,९४,४३७ डॉलर्सचीं कर्जें दिलेलीं काहेत. रोख्यांतील गुंतवणूक २,७०,२५,०८,०८७ डॉलर्सची आहे.

# श्री. वासुदेवराव बेडेकर पतिपत्नी रौप्यतुला व व्ही. पी. बेडेकर अँड सन्स प्रायव्हेट लिमिटेड



श्री. वा. वि. बेडेकर

## सुवर्ण-महोत्सव

## सर्वांचे जाहीर आभार



सौ. रखमाबाई बेडेकर

गेल्या पन्नास वर्षांत आमच्या ' व्ही. पी. बेडेकर अँड सन्स प्रायव्हेट लिमिटेड ' या संस्थेच्या धंद्याच्या वाढीसाठी आणि सर्वांगीण विकासासाठी आम्हांला व्यापारीबंधूंनी, दलालांनीं, वृत्तपत्रें-साप्ताहिकें-नियतकालिकांनीं आणि असंख्य गिऱ्हाइकांनीं जें साहाय्य दिलें, त्या साहाय्यांतूनच आज आम्ही **सुवर्ण-महोत्सवाचा** भाग्यशाली दिवस पाहात आहोंत. या आनंदाच्या वेळीं आम्ही आमच्या साहाय्यकर्त्यांचे आणि आमच्यावर उदंड लोभ ठेवणाऱ्या जनताजनार्दनाचे जाहीर आभार मानतों.

दुकानदारीचा आणि कारखानदारीचा व्यवसायच असा कठीण आहे कीं, तो सर्वांच्या सहकार्याशिवाय उभा राहूं शकत नाहीं. आम्हांला या धंद्यांत नोकरांचें सहकार्य, गिऱ्हाइकांचा लोभ, मालक, कंत्राटदार व सरकार यांची जी मदत लाभली तिचा उल्लेखहि या ठिकाणीं अवश्य केला पाहिजे. यापुढेंहि आम्हांवर असाच लोभ ठेवावा व सर्वांनीं आपलें सहकार्य देऊन आम्हांला उपकृत करावें ही नम्र विनंती.

आपला सर्वांचा कृपाभिलाषि,

**त्रिंबक वासुदेव बेडेकर**

व्यवस्थापक, व्ही. पी. बेडेकर अँड सन्स, प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई-४.

## गिऱ्हाइकांचा संतोष हाच आमचा खरा फायदा

मसाले तयार करतांना त्यांतील द्रव्यें आम्ही प्रमाणशीरपणेंच भाजतों व त्यांतील अन्नसत्त्वें कायम राहतील अशी खबरदारी घेतों. आमच्याकडे रोज मसाला तयार होत असल्यामुळें केव्हांहि घ्या; तुम्हांला आमच्याकडून ताजाच खमंग, सुगंधपूर्ण मसाला मिळेल. उच्च प्रतीचा कच्चा माल आम्ही वापरीत असल्यामुळें आपोआपच उत्तम दर्जाचे मसाले तयार होतात. उत्कृष्ट बेडेकर लोणचें आतां आपल्याला ' पिल्फरप्रूफ ' सीलबंद बाटल्यांतून मिळूं शकेल. सर्वोत्कृष्ट बेडेकर लोणचें तुम्हांला हवी ती रुचि देण्यासाठी सदैव तयार आहे. मूळ दुकान मुगभाट ( गिरगांव ) येथें, दुसरें ठाकुरद्वार नाक्याजवळचें, तिसरें दादर, रानडे रोड-गंगानिवासमध्यें, चौथें फोर्टमध्यें बझारगेट स्ट्रीटवर, आणि पांचवें परळ-पोयबावडीजवळचें, अशीं आमचीं **मुंबई शहरांत पांच दुकानें आहेत.**

### बेडेकर मसाले

ब्राह्मणी गोडा मसाला, तिखट मसाला, संडे स्पेशल डेकन मसाला, उंची तिखट व हळद, स्पेशल गरम मसाला, लोणच्यासाठीं खास तयार मसाला, भज्यांसाठीं तयार भजीपीठ, मसाला-सुपारी, मेतकूट व डांगर, कुळीथ पीठ, भाजण्या, उत्तमपैकीं मध व राईतेल.

### बेडेकर लोणचीं

आंब्याचें लोणचें, लिंबाचें लोणचें, ओल्या मिरच्यांचें लोणचें, आंब्याचें गोड लोणचें, खारें लिंबू, आंबट, गोड, तिखट अशा त्रिविध चवीची मँगो चटणी, आंबा, बेलफळ, सफरचंद, आवळा यांचे मुरांबे, प्रवाळमिश्रित कनोजी मुलकंद-वगैरे सर्व पदार्थ यांत्रिक पद्धतीनें सीलबंद केलेल्या ' पिल्फर-प्रूफ ' बाटल्यांतून मिळतात.

### बेडेकरांचे पापड

मसाले, लोणचीं यांच्याबरोबर बेडेकरांचे निरनिराळ्या प्रकारचे पापड हाहि एक रुचकर, खुसखुशीत पदार्थ सर्वमान्य झालेला आहे. मुगाचे, पोह्यांचे, उडदांचे, मटकीचे व बटाट्याचे असे अनेक पदार्थांचे पापड बनतात; आणि आतां तर जगांतील मोठमोठ्या उपाहारगृहांतून जेवणांत पापड हें खास महाराष्ट्रीय आकर्षण बनलेलें आहे.

### सुवर्ण-महोत्सव, रौप्यतुला आणि २५,००० रु. ची देणगी

२६ जानेवारी १९६१ रोजीं आमच्या धंद्याचा सुवर्ण-महोत्सव आम्ही महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष उद्योगपति माननीय **श्री. का. ह. हमदेरे**, यांच्या अध्यक्षतेखाली ब्राह्मणसभा, गिरगांव, या ठिकाणीं साजरा करीत आहोंत. याच दिवशीं बेडेकर मसालेवाले या धंद्यांतील बेडेकर कुटुंबियांचें अध्वर्यु श्रीमंत **वासुदेव विश्वनाथ** तथा **अण्णासाहेब बेडेकर** व **सौ. रखमाबाई बेडेकर** यांची **रौप्यतुला** करण्यांत येणार असून या रौप्यतुलेद्वारें पंचवीस हजार रुपयांची देणगी ब्राह्मणसभेस बेडेकर धंद्याचे मूळ संस्थापक के. विश्वनाथपंत बेडेकर यांच्या स्मरणार्थ होतकरू विद्यार्थ्यांना साहाय्यार्थ देण्यांत येणार आहे.

**आंतरराष्ट्रीय चित्रपट-महोत्सव**—भारतामधील चित्रपट-व्यवसायाच्या सहकार्यानें ह्या वर्षाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यांत दिल्ली येथें एक आंतरराष्ट्रीय चित्रपट-महोत्सव भरविण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. दिल्ली येथें महोत्सवाचें उद्घाटन होणार असलें तरी महोत्सवांतील चित्रपट नंतर कलकत्ता, मद्रास व मुंबई ह्या शहरांतील चित्रगृहांतून एक आठवडापर्यंत दाखविण्यांत येणार आहेत.

**खेड्यांतील निरुद्योग्यांसाठी**—खेड्यांतील बेकार लोकांचा उपयोग करून घेण्यासाठी राज्य सरकारांनीं कांहीं योजना मध्यवर्ती नियोजन समितीला सुचविल्या होत्या. त्यांपैकी ३० योजनांना नियोजन समितीनें मान्यता दिली आहे. प्रत्येक योजनेचा जास्तींत जास्त २ लाख रुपयांपर्यंतचा खर्च भारत सरकार करणार आहे. ज्या भागांत बेकारी अगर अर्धबेकारी फार असेल तेथें त्या सुरू करण्यांत येणार आहेत.

**कुटुंबीयांशीं नीट वागा**—एखादा सरकारी नौकर आपल्या कुटुंबांतील माणसांशीं अन्यायानें व निष्काळजीपणानें वागत असेल तर त्याला खात्यातर्फे शासन करण्यांची तरतूद केरळ सरकारनें केली आहे. त्याचप्रमाणें सरकारी नौकरांनीं आपल्या खाजगी जीवनांतहि सद्वर्तणूक ठेवली पाहिजे असा आदेश देण्यांत आला आहे.

**विद्यार्थ्यांना प्रवासाची सवलत**—नव्या वर्षाची देणगी म्हणून अहमदाबाद कॉर्पोरेशननें विद्यार्थ्यांना प्रवासाच्या दरांत सवलत दिली आहे. ह्यापुढें अहमदाबादच्या दीड लाख विद्यार्थ्यांना शहरांतील कोणत्याहि मार्गावर कितीहि लांब प्रवास करावयाचा झाल्यास फक्त ५ नये पैसे द्यावे लागतील. ह्या सवलतींमुळें अहमदाबाद कॉर्पोरेशनच्या वाहतुकीच्या उत्पन्नांत अडीच लाख रुपये घट होईल.

**पाकिस्तानचा दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम**—पाकिस्तानच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेला लागणाऱ्या परदेशीय मदतीचा अभ्यास करण्यासाठी पाकिस्तान व जागतिक बँकेचे प्रतिनिधी ह्यांची बैठक भरणार आहे. दरम्यान ह्या कार्यक्रमाची प्राथमिक पाहणी करण्यासाठी बँकेचे प्रतिनिधी लवकरच पाकिस्तानला जात आहेत. पाकिस्तानचा दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम १,९०० कोटि रुपयांचा आहे.

**अणुबाँबपासून संरक्षण**—अमेरिकेवर अणुबाँबचा हल्ला झाल्यास त्यापासून उद्भवणाऱ्या विषारी वातावरणांतून सुरक्षित राहण्यासाठी १० लाखांपेक्षा अधिक कौटुंबिक भुयारी आश्रयस्थानें बांधण्यांत आलीं आहेत. असा हल्ला झाल्यास त्याची खबर देण्याचें व सावधान राहण्याच्या सूचनेचें काम अमेरिकेभर १५ सेकंदांत करण्यांत येईल.



### पैशाची तंगी कशी कमी होणार !

रिझर्व्ह बँकेनें, शेड्यूल्ड बँकांवर, त्यांच्याकडे होणाऱ्या ठेवींतील वाढीपैकीं कांहीं हिस्सा त्यांनीं रिझर्व्ह बँकेंत ठेवला पाहिजे असें बंधन घातलें होतें, तें तिनें आतां काढून घेतलें आहे. बाजारांत पैशाची भयंकर चणचण असून कर्जाची मागणी पुरवणें बँकांना अशक्य होऊन बसलें आहे; त्यामुळें कित्येक बँकांना रिझर्व्ह बँकेकडून ६% व्याज देऊनहि रकमा घेणें भाग पडलें आहे. कांहीं आठवड्यांच्या अवधींतच, रिझर्व्ह बँकेकडून शेड्यूल्ड बँकांनीं आपली उचल १२·२९ कोटि रु. वरून ५३·४५ कोटि रु. वर नेली आहे; त्यांनीं दिलेलीं कर्जे ९५ कोटि रु. नीं वाढली आहेत. बँकांकडील ठेवी वाढल्याखेरीज व्यापार-उद्योगधंद्यांची मागणी पुरी पाडतां येणें अशक्य आहे.

### केनेडींनें कंपन्यांतले शेअर्स विकून टाकले

अमेरिकेचे अध्यक्ष जॉन केनेडी ह्यांनीं अध्यक्षपदाचीं सूत्रें घेण्यापूर्वी कंपन्यांतील आपल्या मालकीचे सर्व भाग विकून त्याचे आलेले पैसे सरकारी रोख्यांत गुंतविले. कोणत्याहि स्वतःच्या हितसंबंधाला प्राधान्य दिल्याचा आरोप कुणालाहि करतां येऊं नये, ह्यासाठी ही दक्षता आहे.

### इलेक्ट्रिकल अॅनॅस्थेशिया

शस्त्रक्रियेचे वेळीं भूल देण्याकरितां जॅक्सन ( अमेरिका ) येथील सर्जनांनीं प्रथमच विजेचा यशस्वी रीत्या उपयोग केला आहे. ह्या उपकरणांतून ७०० सायकल्स प्रवाह पेशंटच्या शरीरांत नेण्यांत येतो. स्विच दिला, कीं ३० ते ६० सेकंदांत पेशंटवर शस्त्रक्रिया सुरू करतां येते आणि स्विच बंद करतांच पेशंट पूर्ववत जागा होतो. अमेरिकेच्या युद्धखात्यानें ह्या शोधाच्या प्रयोगासाठी ग्रँट दिली; युद्धप्रसंगीं अशा उपकरणाचा विशेष उपयोग होणार आहे; रणक्षेत्रावर बऱ्याच वेळेची व सोयींची त्यामुळें बचत होणार आहे.

### ' पगली ' चें साधुत्व आतां पटलें !

खगारिया ( बिहार ) येथील नागरिकांनीं रामप्यारी ह्या भिक्षेकरी स्त्रीच्या श्राद्धदिनीं रामनामाचा जप केला आणि शेंकडों भिक्षेकऱ्यांना जेवण घातलें. रामप्यारी ( ती ' पगली ' ह्या नांवानें ओळखली जात असे ) एका आठवड्यापूर्वी थंडीनें गारठून मरण पावली. ती स्वतःच्या मिळणाऱ्या भिक्षेंतून, आपल्यापेक्षा भुकेल्या आणि पंगू भिक्षेकऱ्यांना खाऊ घालत असे. तिच्या स्मृतीप्रीत्यर्थ, तिच्या मृत्युस्थानीं मुलांच्यासाठी बाग करण्यांत येणार आहे.


एकमेका करूं साहाय्य, अवघे धरूं सुपंथ

या सुनीतीस अनुसरून..........

सुवर्णमहोत्सवाची वाटचाल झपाट्यानें करीत असलेली

**पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड**

लक्ष्मी पथ, पुणें २.

आपल्या सेवेस सत्वर तत्पर आहेच.

सें को बँ क

सव्वीस शाखा.
सुरक्षित ठेवघरें.
बँकिंगचे सर्व व्यवहार.
अल्प व्याजावर सोसायट्यांना कर्जपुरवठा.

शि. म. काळे, एम्. एल्. ए.
अध्यक्ष.

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक,
## लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : ४४८३.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षें | : | २¾ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | ३½ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींच्या दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.<br>ता. ११-७-५७ — वा. ग. आळतेकर, कार्यकारी संचालक

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

स्थापना : १९११

टेलिफोन, नं. २५५४७४-७५ — पोस्ट बॉक्स नं. ७७२, तारेचा पत्ता—कार्मरबँक

मुख्य कचेरी— ९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई

चेअरमन : श्री. प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठीं दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. | १ कोटी, ४५ लक्ष |
| गंगाजळी व फंड | रु. | ७२ ,, |
| ठेवी | रु. | १४ कोटी, १६ लक्ष |
| खेळतें भांडवल | रु. | २७ कोटी |

महाराष्ट्र राज्यांतील, शाखा व संलग्न बँका ३०४

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींसाठीं चौकशी करावी.

चिं. द. दाते,<br>कार्यकारी संचालक.

नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

# दि बेळगांव बँक लिमिटेड

## बेळगांव

(शेड्यूल्ड बँक)

स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्यें, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठीं नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंग्जचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येते.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत यांची नेहमींच वाढ करीत असलेली

दि बेळगांव बँक लिमिटेड.

एच्. एस्. कुलकर्णी<br>जनरल मॅनेजर

# दि मिरज स्टेट बँक, लि.

हेड ऑफिस : मिरज

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९२९

| | |
|---|---|
| वसूल शेअर भांडवल | : रुपये सहा लाख |
| खेळतें भांडवल | : रुपये एक कोट |
| रिझर्व्ह फंड व इतर फंड | : रुपये सात लाख |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर

(१) तीन वर्षें मुदत ठेवीकरितां व्याज दर ४ टक्के.<br>(२) पांच वर्षें मुदत ठेवीकरतां व्याज दर ४½ टक्के.

हेड ऑफिस मिरजमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची उत्कृष्ट व्यवस्था.

बँकेच्या शाखा: सांगली (गणपति पेठ), सांगली (मार्केटयार्ड), कुर्डूवाडी, बार्शी, पंढरपूर, करमाळा व लक्ष्मेश्वर.

श्री. एन. पी. कानिटकर, ॲडव्होकेट, चेअरमन. — के. डी. शिराळकर, मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.